# <u>उच्च न्यायालय, मुंबई</u>

मुंबई उच्च न्यायालयाच्या आस्थापनेवर **''वाहनचालक''** या पदाची सद्यस्थितीत रिक्त असणारी ४ पदे व पुढील २ वर्षात रिक्त होणारी ४ पदे, अशा एकुण ८ पदांकरीता ८ उमेदवारांची निवड यादी आणि २ उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करणेसाठी निरोगी, इच्छुक व पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागिवण्यांत येत आहेत. सदर निवड यादी व प्रतिक्षा यादी ही प्रसिद्धीच्या दिनांकापासून फक्त २ वर्षासाठीच वैध राहील. सदर पदाची वेतन मॅट्रीक्स एस–६: १९,९००–६३,२००/– व भत्ते अशी आहे.

चाचणीसाठी /मुलाखतीसाठी उमेदवारास स्वखर्चाने हजर रहावे लागेल. नियुक्ती व अल्पसुचीचे (shortlisting) सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

**अ) <u>पात्रता :–</u>**

१. उमेदवार कमीत कमी एस.एस.सी (दहावी) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असावा.

२. उमेदवारास मराठी व हिंदी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

३. जाहिरात प्रसिद्धीच्या तारखेस उमेदवाराचे वय किमान २१ वर्ष व कमाल ३८ वर्ष असावे. मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष राहील. न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांना वयाची अट नाही.

४. उमेदवाराकडे जाहिरात प्रसिद्धीच्या दिनांकास व त्यानंतर मोटर वाहन अधिनियम १९८८ (क्र. ५९/१९८८) प्रमाणे वैध व कार्यरत असा किमान हलके मोटार वाहन (LMV) चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसन्स) असावा.

....२/–

५. उमेदवारास अर्ज करण्याच्या तारखेस किमान ३ वर्ष हलके किंवा जड मोटर वाहन चालवण्याचा अनुभव असावा.

६. उमेदवाराचा वाहन चालविण्याचा पूर्व कार्यकाल (रेकॉर्ड) स्वच्छ असावा.

७. उमेदवारास मोटर वाहनाची देखभाल व सर्वसाधारण दुरूस्तीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

८. उमेदवारास मुंबई शहराची स्वाभाविक रचना (Topography) माहित असावी.

९. उमेदवार शारीरिकदृष्टया सुदृढ आणि निर्व्यसनी असावा.

१०. चारचाकी वाहन चालविण्याचा आणि वाहनदुरूस्ती या दोन्हीचा अधिकतम अनुभव असणाऱ्या तसेच इंग्रजी भाषा किमान समजता व बोलता येणाऱ्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

**ब) पात्र उमेदवारीकरीताच्या अटी :—**

१. तो/ती करार करणेस सक्षम असावा/असावी.

२. त्याला/तिला नैतिक पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आले नसावे किंवा त्याला/तिला कोणत्याही न्यायालय/ एम.पी.एस.सी./यु.पी.एस.सी. किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडींमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे काढून टाकले नसावे किंवा अपात्र ठरवले नसावे.

३. त्याला/तिला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवले नसावे किंवा त्याच्या/तिच्याविरुद्ध फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

४. त्याने/तिने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे त्याच्या/तिच्या उमेदवारीसाठी निवड समिती किंवा तिच्या सदस्यांवर कोणत्याही प्रकारे प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केलेला नसावा.

....३/—

५. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ नुसार, उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास, २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे, हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक नसावी.

**क) अर्ज करण्याची पद्धत**

१. अर्ज सादर करतांना https://bombayhighcourt.nic.in या वेबसाईट वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करूनच अर्ज सादर करावा.

२. ऑनलाईन अर्ज जाहिरात प्रसिद्धिच्या दिनांकापासून १५ दिवसांत करावा. प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकाराने अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

३. पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज https://bombayhighcourt.nic.in या वेबसाईटद्वारे दिनांक २८.०३.२०२२ ते दिनांक ११.०४.२०२२ पर्यत सादर करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्जाची लिंक दिनांक २८.०३.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडेल आणि दिनांक ११.०४.२०२२ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता बंद होईल.

४. उमेदवारांनी संपूर्ण जाहिरातीचे वाचन करूनच अर्ज भरावा. संपूर्ण भरलेला अर्ज **Submit** केल्यानंतर त्या अर्जाची **Printout** काढावी. **Printout** वर दिलेल्या जागेवर स्वतःचा अर्ज भरतांना **Upload** केलेला फोटो चिटकवावा आणि विहित जागेवर काळया पेनाने स्वाक्षरी करावी. सदरील अर्ज उमेदवाराने स्वतःजवळ जतन करून ठेवावा. सदरील अर्ज आणि शैक्षणिक कागदपत्रे या कार्यालयात पोष्टाने पाठवू नये. मात्र निवड प्रक्रियेदरम्यान दिलेल्या सूचनेनुसार आवश्यक त्या—त्यावेळी सदरील अर्जाची प्रत उपलब्ध करावी.

५. ऑनलाईन पद्धतीने अर्ज करताना उमेदवाराने स्वतःचा अद्यावत पासपोर्ट साईज चा फोटो (३.५सें.मी X ४.५ से.मी) व स्वतःची स्वाक्षरी (३ सें. मी X २.५ से.मी) स्कॅन करून ४० KB पेक्षा जास्त साईज होणार नाही अशा पद्धतीने दोन स्वतंत्र फाईल्स **jpg/jpeg format** मध्ये करून ऑनलाईन अर्जात दर्शविलेल्या ठिकाणी सदर फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे अनिवार्य आहे. (टिप. फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी). प्रवेशपत्रावर/अर्जावर दुसऱ्याचा फोटो/स्वाक्षरी असल्यास उमेदवारास निवडीच्या टप्प्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

...४/—

६. उमेदवाराने एकापेक्षा जास्त ऑनलाईन अर्ज सादर केल्यास त्याच्या/तिच्या फक्त शेवटच्या अर्जाचा विचार करण्यात येईल.

७. उमेदवाराने http://bombayhighcourt.nic.in या वेबसाईट वर क्लिक करून Recruitment मध्ये Staff Car driver च्या Apply Online वर क्लिक करावे तद्नंतर SBI Collect द्वारे ऑनलाईन फी भरावी तद्नंतर SBI Collect reference No. प्राप्त होईल तद्नंतर ऑनलाईन फॉर्म भरावा.

८. उमेदवाराने आपली सर्व माहिती योग्यरित्या भरून झाल्यावर सर्वात शेवटी I Agree बटणावर क्लिक करून अर्ज प्रस्तुत (Submit) करावा.

९. उमेदवाराने स्वत:च्या माहितीस्तव जो फॉर्म भरलेला आहे त्याची प्रत Print Application मध्ये जाऊन Registration ID No टाकून Print काढून स्वत:कडे जतन करून ठेवावी.

१०. ऑनलाईन फॉर्म भरत असताना आपण जाहिरातीतील नमुद शैक्षणिक पात्रता/अनुभव/ इतर बाबींची पूर्तता केली असेल तरच आपला अर्ज स्विकारला जाईल.

११. परीक्षेच्यावेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१२. उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची (कार्यालयाची) मंजूरी घेतल्याचे ना—हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**ड) <u>उमेदवारांकरीता आवश्यक सूचना :</u>**

१) अर्जदाराने अर्ज करतांना **शुल्क रुपये १००/—** भरणे आवश्यक आहे आणि ते शुल्क परत मिळणार नाही.

२) अर्ज शुल्क भरल्याशिवाय अर्जदारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

**इ) <u>ऑनलाईन शुल्क भरण्याची पध्दत</u>**

१. उमेदवाराला नोंदणी शुल्क रू. १००/— **'SBI Collect'** द्वारे ऑनलाईन पेमेंट करणे आवश्यक आहे.

...५/—

२. उमेदवारांना **‘SBI Collect’** सुविधेद्वारे ऑनलाईन पेमेंटसाठी **'User Mannual'** मध्ये दिलेल्या निर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे.

३. अर्ज स्विकारण्यासाठी फक्त यशस्वी पेमेंट झालेल्या व्यवहारांचाच विचार केला जाईल.

४. **‘SBI Collect’** सुविधेद्वारे तयार केलेले नियम, अटी व शर्तीची कोणतीही जबाबदारी मुंबई उच्च न्यायालय प्रशासनाची नाही. ऑनलाईन पेमेंट करताना काही तांत्रिक बिघाड झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. या बाबत कोणत्याही स्वरूपाची चौकशी/दाव्याची दखल घेतली जाणार नाही.

**फ)** ज्या उमेदवारांना मुलाखतीकरीता बोलवण्यात येईल, त्यांनी खालील कागदपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती त्यांच्या मुळ प्रमाणपत्रांसह पडताळणीसाठी मुलाखतीच्या वेळी सोबत आणाव्यात.

१. जन्मतारखेच्या पुराव्याचा दाखला (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र /जन्म प्रमाणपत्र/ एस.एस.सी चे बोर्ड प्रमाणपत्र).

२. शैक्षणिक पात्रतेच्या परिक्षेचे गुणपत्रक.

३. शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र.

४. जाहिरात प्रसिध्दी नंतरची तारीख असलेली दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी दिलेली चारीत्र्य संपन्नतेविषयीचे प्रमाणपत्र. (त्यांचा हुद्दा, पत्ता व फोन नंबर सह) (अर्जासोबत ऑनलाईन Form-B नमुन्यात)

५. वैध वाहन परवान्याची (ड्रायव्हींग लायसन्स) प्रत.

६. मोटार वाहन चालविण्याचे किमान ३ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र. प्रमाणपत्रावर जारी करणाऱ्या संस्थेचे/ व्यक्तीचे नावं, स्वाक्षरी, पत्ता तसेच संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे.

७. वाहन दुरूस्ती/देखभालीचे ज्ञान असले बाबतचे प्रमाणपत्र. प्रमाणपत्रावर जारी करणाऱ्या संस्थेचे/व्यक्तीचे नावं, स्वाक्षरी, पत्ता तसेच संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे.

८. तत्सम अधिकाऱ्याने प्रदान केलेला जातीचा दाखला (मागासवर्गीयांसाठी).

९. महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

१०. सेवा योजन कार्यालयात नोंदणी केली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

११. लहान कुटुंबा बाबत स्वयं घोषणापत्र.

१२. उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची (कार्यालयाची) मंजूरी घेतल्याचे ना—हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

१३. विवाहित महिला उमेदवाराच्या बाबतीत जर तिने लग्नानंतर तिचे नांव बदलले असेल तर तिच्या नावाच्या बदला बाबत दस्तऐवज जसे की शासकीय राजपत्र, सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह प्रमाणपत्राची प्रत इ.

१४. संबंधीत इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन अर्जामध्ये दिलेल्या माहितीसह.

१५. न्यायालय प्रशासनाने विचारल्यास इतर कोणतेही दस्तऐवज.

**ग) <u>उमेदवारांकरीता इतर आवश्यक सूचना :</u>**

१. सदरहु पदे जशी जशी रिक्त होतील त्यानुसार नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत/स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

२. भरती रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे, याबाबत सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

३. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

..७/—

४. अर्जदार जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र आहे असे समजून त्याला लेखी परीक्षेकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. मुलाखती/नियुक्ती पूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास नियुक्ती करण्यात येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

५. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येनुसार व उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्तेनुसार **अल्प सुची (Shortlisting)** करण्याचे सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, मुंबई यांनी आपल्याकडे राखून ठेवले आहेत.

६. केवळ अर्ज दाखल केला यावरून मुलाखतीचा किंवा नेमणूकीचा हक्क मागता येणार नाही. तसेच उमेदवाराची उच्च शैक्षणिक पात्रता हा सदर पदाच्या निवडीसाठी मुख्य आधार मानला जाणार नाही.

७. आलेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर अल्प सुची प्रमाणे पात्र उमेदवारांना खालील निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

(१) लेखी परिक्षा — २० गुण **(उत्तीर्ण गुण किमान ७)**
लेखी चाचणीसाठी प्रश्नपत्रिकेमध्ये खालील विषयांवर वस्तुनिष्ठ नानाविध निवडीचे प्रश्न असतील.
**(i.e. objective type and multiple choice questions)**
अ) वाहनांची देखभाल व किरकोळ दुरूस्ती विषयक ज्ञान.
ब) मुंबई शहर व त्यालगतची महत्वाची स्थळे व रस्त्यांची माहिती.
क) सामान्य ज्ञान.

(२) पूर्वानुभव — १० गुण

(३) मोटर वाहन परिक्षा— १० गुण **(उत्तीर्ण गुण किमान ७)**
(प्रादेशिक परिवहन कार्यालय अधिकाऱ्यांमार्फत)

(४) वैयक्तिक मुलाखत — १० गुण

**निवड प्रक्रियेचे एकुण गुण —५० (उत्तीर्ण गुण किमान २५)**

**टिप:** लेखी परिक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मोटर वाहन परिक्षेस बोलवण्यात येणार नाही. तसेच मोटर वाहन परिक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना वैयक्तिक मुलाखतीस बोलवण्यात येणार नाही.

८. मोटार वाहन परीक्षा तसेच मुलाखतीसाठी बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारांनी त्यांनी अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती पडताळणीसाठी आणाव्यात. तसेच या कार्यालयास मान्य होईल असे स्वत:चे फोटो प्रमाणपत्र **(Photo ID)** जसे मतदार कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना यापैकी एखादा पुरावा आणावा.

९. पात्र उमेदवारांना (नेमलेल्या तारखांना) लेखी परीक्षांसाठी, मोटार वाहन परिक्षांसाठी व तोंडी मुलाखतीसाठी स्व:खर्चाने हजर राहावे लागेल.

१०. कार्यालयाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षीत घटनेमुळे भरती प्रक्रियेचे वेळापत्रक बदलू शकते असा बदल वेळोवेळी उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल.

११. उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतीची सूचना उशीरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेस लेखी परिक्षेस, मोटारवाहन परिक्षेस किंवा मुलाखतीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास, उच्च न्यायालय प्रशासनाकडून या बाबत कोणतीही तक्रार /दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही.

१२. अपुर्ण/चुकीची माहिती असलेला अर्ज नाकारला जाईल. उमेदवाराने दिलेला कोणताही तपशील खोटा किंवा चुकीचा असल्याचे आढळल्यास, उमेदवाराला निवड प्रक्रियेत भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि नियुक्त झाल्यास त्याला काढून टाकण्यात येईल. कोणतीही वस्तुस्थिती दडपल्यास अर्ज नाकारला जाईल.

...९/–

१३. अल्पसुचीत पात्र उमेदवारांसाठी लेखी परीक्षा, मोटार वाहन परिक्षा तसेच तोंडी मुलाखतीचे वेळापत्रक मुंबई उच्च न्यायालयाचे संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात येईल. उमेदवाराने परिक्षेचे प्रवेश प्रमाणपत्र 'Admit Card' वर क्लीक करून प्रिंट काढून घ्यावे.

१४. उमेदवाराने लेखी परीक्षा तसेच मोटरवाहन परिक्षेमध्ये मिळविलेल्या गुणांच्या आधारे, तसेच त्याच्या अर्जाची छाननी व त्याने तोंडी मुलाखतीचे वेळेस हजर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर उमेदवारांची तोंडी मुलाखतीची पात्रता अंतिमरित्या ठरविण्यात येईल. फक्त पात्र उमेदवारांचीच तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

१५. उमेदवाराने निवड समितीच्या सदस्यांना किंवा उच्च न्यायालयात काम करण्या—या अधिका—यांना / कर्मचा—यांना भेटण्याचा किंवा त्याच्यावर त्याच्या निवड प्रक्रियेसंबंधी व्यक्तीशः अथवा इतर कोणा मार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला निवड प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल व यासंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१६. मंजूर केलेली निवड यादी ही प्रसिद्धीच्या दिनांकापासून फक्त २ वर्षासाठीच वैध राहील. त्यास मुदतवाढ न दिल्यास सदरची निवड यादी रद्द करण्यात येईल.

१७. मंजूर केलेली प्रतिक्षा यादी ही प्रसिद्धीच्या दिनांकापासून फक्त २ वर्षासाठीच किंवा सदर पदासाठी नविन निवड/ प्रतिक्षा यादी प्रसिद्ध होईपर्यंत, जे प्रथम घडेल तो पर्यंत वैध राहील.

१८. निवड/प्रतिक्षा यादीतील उमेदवार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत कर्तव्यात सामील होऊ शकला नाही तर त्याचे नाव निवड/प्रतिक्षा यादीतून काढून टाकले जाईल.

...१०/—

१९. निवड यादीतील उमेदवार त्याला दिलेल्या वेळेत कर्तव्यावर हजर न झाल्यामुळे किंवा निवड यादीतील उमेदवाराने नियुक्त झाल्यापासून १ वर्षाच्या आत राजीनामा दिल्यामुळे, रिक्त होणाऱ्या पदासाठी जर त्यावेळेस निवड यादी संपली असेल, तरच त्यावेळेस प्रतिक्षा यादीचा विचार करण्यात येईल.

२०. निवड यादीतील उमेदवारांची नियुक्ती सुरूवातीला दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्याबद्दल प्रमाणपत्र जारी होईपर्यंत नियुक्तीच्या सेवा कोणत्याही वेळी, कोणतीही नोटीस न देता किंवा कोणतेही कारण न देता समाप्त केल्या जातील.

२१. उमेदवारांची निवड ही लेखी, मोटार वाहन परिक्षा आणि मुलाखतीत मिळालेल्या गुणांच्या आधारे केली जाईल.

२२. या निवड प्रक्रियेत निवड समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल.

**आदेशावरुन**

**सही/—**

**दिनांकः १४ मार्च, २०२२** **महाप्रबंधक**

**मुंबई येथील उच्च न्यायालयाचा न्यायाधिकार**

**Form 'A'**

## नमुना 'अ'

### प्रतिज्ञापत्र

मी, श्री/श्रीमती/कु ........................................................ श्री/श्रीमती................................................यांचा मुलगा/मुलगी/पती/पत्नी, वय ............. वर्षे, राहणार........................., याद्वारे पुढील प्रमाणे जाहीर करतो/करते की,

१. मी वाहनचालक या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे.

२. आज रोजी मला ............ (संख्या) इतकी मुले आहेत. यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .......... आहे. (जन्मदिनांक नमूद करावा)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

४. मी असेही जाहीर करतो/करते की, माझ्या विरूद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नाही किंवा माझ्या विरूद्ध फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावलेली नाही किंवा माझ्या विरूद्ध शिस्तभंगाची कार्यवाही झालेली नाही.

दिनांक: / /

ठिकाणी: ....................... उमेदवाराची स्वाक्षरी व नाव

**Form ‘B’**

## नमुना ‘ब’

## चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ........................................................................... हे/हया.................तालुका..................,जिल्हा..............., येथील रहिवासी असून, मी त्यांना मागील ............... वर्षापासून ओळखतो, त्यांची वर्तणूक व चारित्र्य चांगले आहे. ते/त्या माझे/माझ्या नातेवाईक नाहीत.

करिता सदरील वर्तणूक/चारित्र्य प्रमाणपत्र देण्यात येत आहे/दिले आहे.

ठिकाणः— ..................

दिनांकः— ...................

प्रमाणपत्र देणाऱ्याचे नाव, हुद्दा व सही

सही ..........................................

नाव ..........................................

पत्ता ..........................................

..........................................

..........................................

भ्रमणध्वनी क्रमांक ...........................

# ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शक सूचना

१. ऑनलाईन अर्ज भरणे सुरु करण्यापूर्वी उमेदवाराने वाहनचालक पदासंबंधीची संपूर्ण जाहिरात वाचावी. ऑनलाईन अर्ज हा इंग्रजी भाषेत भरला जाईल.

२. ऑनलाईन अर्ज भरणे सुरु करण्यापूर्वी उमेदवाराने स्वत:चा अद्यावत पासपोर्ट फोटो आणि स्वाक्षरी स्वतंत्र स्कॅन करुन **४० KB** पेक्षा जास्त साईज होणार नाही अशी **jpg / jpeg format** मध्ये दोन वेगवेगळया फाईल्स तयार ठेवाव्यात.

३. ऑनलाईन अर्जातील संपूर्ण माहिती अचुक भरणे उमेदवारास बंधनकारक आहे.

४. उमेदवाराने माहिती भरताना संपूर्ण नावाचे (spelling) त्याच्याजवळ उपलब्ध असलेल्या शैक्षणिक कागदपत्रानुसार अचुक नमुद करावे.

५. उमेदवाराने पत्रव्यवहाराचा अचुक पत्ता व पिनकोडसहीत द्यावा. अर्धवट पत्ता देऊ नये.

६. उमेदवाराने उपयोगात असलेलाच ईमेल, मोबाईल क्रमांक द्यावा.

७. उमेदवाराने आपली जन्मतारीख, शैक्षणिक कागदपत्रे / जन्मप्रमाणपत्राद्वारे अचुक लिहावी.

८. उमेदवाराने स्वत:चा आधार कार्ड क्रमांक अचुक नमूद करावा.

९. उमेदवाराने त्याच्या शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारे अर्जात अचूक शैक्षणिक माहिती भरावी.

१०. उमेदवारास ज्या भाषांचे ज्ञान आहे त्यांची नोंद करावी.

११. उमेदवारास वाहन चालविण्याचा अनुभव असल्यास तो नमूद करावा.

१२. उमेदवाराने त्याच्याकडे असणाऱ्या वैध वाहन परवान्याची संपूर्ण व अचूक माहिती भरावी.

१३. उमेदवाराकडे वाहनाची देखभाल व किरकोळ दुरूस्तीचे ज्ञान/अनुभव असल्यास त्याबद्दलची माहिती भरावी.

...२/—

१४. उमेदवाराने त्याला ओळखत असलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींकडून चांगली वर्तणूक व चारित्र्याबाबतचा दाखला प्राप्त करावा आणि अर्ज भरतांना सदरील व्यक्तींची माहिती अर्जात नमूद करावी. सदरील दाखला हा जाहिरात प्रसिध्दीनंतरच्या तारखेचा असावा. सदरील प्रतिष्ठित व्यक्ती ही उमेदवाराची जवळची नातेवाईक/मित्र नसावी.

१५. उमेदवार विवाहित असल्यास, त्याने अपत्यांविषयीची योग्य ती माहिती त्या—त्या रकान्यात भरावी. विवाहित उमेदवारास आज रोजी अपत्य नसेल किंवा उमेदवार अविवाहीत असेल तर त्याने रकान्यात ''०'' (शून्य) अशी माहिती भरावी.

१६. जेथे पदवीकरीता CGPA/SGPA or Letter grade देण्यात येते, तेथे संबंधित विद्यापीठ/संस्थेच्या निकषानुसार शेवटच्या वर्षातील एकुण गुण व अर्जदारास मिळालेले एकुण गुण, शैक्षणिक पात्रतेच्या रकान्यात नमुद करावेत.

१७. उमेदवाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास किंवा पुर्वी एखाद्या प्रकरणात फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती द्यावी. खरी माहिती दडवून ठेवल्यास उमेदवारनियुक्तीस अपात्र ठरेल. नियुक्तीनंतर सदर माहिती प्रशासनाच्या निदर्शनास आल्यास उमेदवारास कोणतीही पूर्वसूचना न देता नोकरीवरुन कमी केले जाईल.

१८. उमेदवाराने अर्जात योग्य त्या ठिकाणी, ४० केबी पेक्षा कमी आकार असलेल्या स्वत:च्या स्कॅन फोटोची jpg / jpeg format मधील फाईल Upload करावी.

१९. उमेदवाराने अर्जात योग्य त्या ठिकाणी, ४० केबी पेक्षा कमी आकार असलेल्या स्वत:च्या स्कॅन स्वाक्षरी jpg / jpeg format मधील फाईल Upload करावी.

२०. अर्ज Submit करण्यापूर्वी उमेदवाराने भरलेला अर्ज बरोबर आहे याची खात्री करावी, Declaration चे वाचन करावे व नंतरच I Agree या बटणावर Click करावे. अर्ज Submit झाल्यावर उमेदवारास अर्जात कोणताही बदल करता येणार नाही.

...३/—

२१. अर्ज Submit झाल्यानंतर येणारा Registration ID Number उमेदवाराने नमूद करुन घ्यावा आणि Print Application हे ऑप्शन Select करुन ऑनलाईन अर्जाची Print out काढावी.

२२. सदरील Print out काढल्यानंतर शेवटी दिलेल्या जागेवर उमेदवाराने आपला स्वत:चा फोटो चिटकवावा आणि सोबतच्या रकान्यामध्ये काळया पेनाने स्वत:ची सही करावी. सदरील Print out उमेदवाराने आपल्याकडे पुढील कार्यवाहीसाठी जतन करुन ठेवावी.

*************